# भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक स्त्री क्रांतिकारक राणी चेन्नम्मा यांच्या कार्यांचा ऐतिहासिक अभ्यास

**कु. नेहा बोरे**
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**घोषवारा:**

भारत हा एक पुरुषप्रधान देश असल्याने येथे झालेल्या अनेक लढयांमध्ये पुरुषाचीच माहिती पाहायला मिळते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेक रणरागिनी स्त्रियांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. यातीलच एक महान महिला क्रांतिकारक म्हणजे कित्तूरची राणी चन्नम्मा ह्या होत. झाशीच्या राणी लक्ष्मीबाईप्रमाणेच सशस्त्र क्रांतीचा मार्ग त्यांनी अवलंबला. ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनी विरुद्ध झालेल्या प्रारंभिक उठावामध्ये कित्तूरच्या उठावाचे महत्वाचे स्थान आहे. कित्तूरच्या राणी चन्नम्मा यांनी आपल्या शौर्य व कर्तुत्वाने अनेक भारतीय क्रांतीकाऱ्यासमोर प्रेरणा दिल्या. तथापि त्यांच्या कार्यांचा गौरव फक्त कित्तूर पुरतेच मर्यादित राहिल्याचे दिसून येते. स्त्री असूनही रणांगणावर उतरून लढण्याचे सामर्थ दाखवणाऱ्या शूर राणी चनम्मा विषयी प्रस्तुत शोध निबंधातून अभ्यास केला जाणार आहे.

**कळीचे मुद्दे:** पुरुषप्रधान, क्रांतिकारक , कित्तूर, सशस्त्र क्रांती, रणांगण...

**प्रस्तावना :**

देश प्रेमासाठी कोणत्याही प्रकारचा त्या करण्यासाठी व जीवाचे बलिदान देण्यासाठी राणी चन्नम्मा ह्या तत्पर होत्या. त्या अतिशय साहसी देश प्रेमी व स्वातंत्र्याची आस असणाऱ्या महिला क्रांतिकारक होत. कित्तूरच्या राणी चन्नम्मा यांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील कागती येथे 23 ऑक्टोंबर 1778 रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव धूळप्पा आणि आईचे नाव पद्मावती असे होते. राणी लक्ष्मीबाई यांच्या आधी 33 वर्षे त्यांनी ब्रिटिश राजवटीला आपल्या शौर्याद्वारे आवाहन दिले होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरोधी झालेल्या युद्धात त्यांचा सुरुवातीस विजय झाला त्यांच्या विजयाने अनेकांना प्रेरणा मिळाल्या. तिरंदाजी, तलवारबाजी, भालायुद्ध अशा अनेक मर्दानी कलांची त्यांना आवड होती व यामध्ये त्यांनी लहानपणापासूनच प्राविण्य मिळवले होते. राणी चन्नम्मा यांना कानडी, मराठी, उर्दू, संस्कृत या भाषा अवगत होत्या. त्यांचा विवाह मल्ल सर्जा देसाई यांच्या सोबत झाला. जे कित्तूरचे देसाई म्हणजेच वतनदार होते. त्यांचा पुत्र शिवलिंग याला गादीवर बसवून त्यांचा राज्याभिषेक केला गेला .

**दत्तक वारस प्रश्न:**

18 मे 1824 रोजी गुरुलिंग रुद्र सर्जा कित्तूरला आला त्याने काही औषधे आणली होती. या भेटीत शिवलिंग गुरु रुद्र सर्जा बरोबर त्याने संस्थानांच्या बाबतीत काही चर्चा केली. त्याचे दोन्ही भाऊ तरुणपणीच वारले होते व त्याला स्वतःला मूलबाळ नव्हते त्याच्या मृत्यूनंतर गादीवर कोण यावे हा प्रश्न त्याला सारखा बेचैन करत होता. आपला मृत्यू जवळ आला असे त्याला वाटू लागले की आपण दत्तक विधानाला अंतिम मान्यता देऊ असे शिवलिंग रुद्र सर्जाने सांगितले. त्या मुलाला दत्तक घेण्याचा आपला मनोदय स्वामी मस्तमर्डीच्या बाळप्पागौडाला पत्र लिहून कळवले. पत्रात असे लिहिले होते की, “आमच्या पोटी संतान नाही, तुमचे पुत्र शिवलिंगप्पास आणून दत्तक करून घेण्याचे ठराव केले आहे, आता आमची तब्येत कमी जास्त होत आहे. कारण पत्र पाहताच चिरंजीवास घेऊन यावे म्हणजे शिक्का घालून संस्था स्वाधीन करितो.” शिवलिंग रुद्रसर्जाची प्रकृती काहीशी सुधारली आणि त्यामुळे हे पत्र त्यांच्याकडून लगेच पाठवले गेले नाही. त्यानंतर सुमारे दोन महिने म्हणजे सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात मध्ये पुन्हा बिघडेपर्यंत त्यांची प्रकृती त्यामानाने बरी होती. 11 सप्टेंबर 1824 रोजी त्याची अवस्था मोठी चिंताजनक झाली. आपला मृत्यू जवळ आला असे त्याना वाटले त्या दिवशी दुपारी दोनच्या सुमारास त्याने आपल्या सरदारांना आणि इतर सहाय्यकरांना बोलाविणे पाठवले दत्तक विधान उरकण्याचा हुकूम केला. मुलाला आणण्यात आले आणि मंगल स्नानासारखा

प्रारंभिक विधी झाल्यानंतर देसाई पदाची निशाणी असा शिक्का आणि कायदेशीर वारसा म्हणून कित्तूर संस्थानाचे सर्व अधिकार त्याला देण्यात आले. रविवारी 12 सप्टेंबर 1824 रोजी तो मरण पावला. कन्नूर मल्लाप्पा आणि सरदार मल्लप्पा यांनी लिहिलेले पत्र 12 तारखेला सकाळी देण्यात आले. पत्रावर दहा जुलै 1824 ही तारीख असल्याने पत्राच्या अस्सलपणाबाबत संशय आला त्याने धारवाडच्या सिव्हिल सर्जन डॉक्टर जी एच बेल याला तातडीने बोलावून घेतले आणि कित्तूरला जाऊन नेमकी काय परिस्थिती आहे हे पाहायला सांगितले. कित्तूर आपले आहे आपल्या स्वतःच्या मुलखाचे आपण मालक आहोत. आम्ही त्यांची परवानगी घेतली नव्हती. म्हणून दत्तक विधान खरे नव्हे असे ब्रिटिश म्हणू लागले. कित्तूर म्हणजे लहान असेच संस्थान चुटकीसरशी जिंकता येईल. अशा मोठ्या प्रमाणात भाट धडपड करीत आहेत नक्कीच त्यांचा गैरसमज झाला. परंतु हे लोक लोक स्वातंत्र्यावर जिवापाड प्रेम करतात हे इंग्रजांना माहीत नव्हते. ब्रिटिशांच्या तुलनेत कित्तुरचे सैन्य संख्येने कमी होते पण सैनिक द्रव्य लोभी नव्हते.

**कित्तूरची दुसरी लढाई :**

24 ऑक्टोबर 1824 रोजी राणी चन्नम्मा व तिच्या सैन्याने इंग्रजांचा एक वकील मारला. त्याची वार्ता घेऊन धारवाडचा असिस्टंट कलेक्टर थेकरे इंग्रजांकडे गेला. त्या बातमीने इंग्रज एवढे हडबडून उठले बेळगावला गुप्तहेराबरोबर पुढील निरोप ताबडतोब पाठवला. धारवाडच्या ब्रिटिशांच्या लष्करी व नगरी अधिकाऱ्यात प्रचंड खळभर उडाली. यामध्ये काही ब्रिटीशांचा मृत्यू झाला. ब्रिटिश सरदारांनी थकरे, कॅ. ब्लॅक, ले. सेवेल आणि ले. डेयूटन यांचे मृतदेह धारवाडला नेले होते. धारवाडच्या युरोपियन दफनभूमीत त्यांचे दफन करण्यात आले. या पराजयानंतर ब्रिटिश स्वस्थ बसणार नव्हते, कित्तूरवर जोरदार चढाई करायला व मनुष्यबळ गोळा करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. कित्तूरच्या राणी चन्नमाने ब्रिटिशांशी लढा देण्याचा निर्धार केला. मनुष्यबळ, शस्त्रास्त्रे व युद्धतंत्र या बाबतीत ब्रिटिश फौजांची ताकद फार तुलनेने जास्त होती. चार दिवसांमागे तातडीचा निरोप पाठवलेल्या कोल्हापूरच्या राजाचा प्रतिसाद हीच आता राणीची एकमेव आशा होती. पण त्याच्याकडून काहीही निरोप आला नाही तेव्हा सर्व विचार करून राणीने व तिच्या सहकाऱ्यांनी एकमताने निर्णय घेतला. ब्रिटिशांशी स्नेहभावाने सलोखा करण्याचे आपले प्रयत्न मनःपूर्वक चालू ठेवावेत आणि पूर्वीप्रमाणे संस्थानाला स्वयंशासनाचे अधिकार द्यायला त्यांना प्रवृत्त करावे. कोल्हापूरचा राजा आपल्याला लवकरच येऊन मिळेल अशी राणी चेन्नम्माला मोठी आशा होती. त्यामुळे दक्षिणी संस्थानांच्या प्रत्येक देशप्रेमी अधिपतीला ब्रिटिश सत्तेविरुद्ध चाललेल्या या उठावात सामील व्हायची प्रेरणा मिळणार होती. तरीही त्यांनी 27 ऑक्टोबर 1824 रोजी उत्साही सरदार निधरकादारांनी कित्तूर मध्ये राज्याभिषेक समारंभ साजरा केला. तेवढ्यात ब्रिटिश सैन्याची एक तुकडी राणी चेन्नम्माच्या शिपायांचा कडक पहारा असलेल्या कम्पनमडच्या पश्चिम बाजूला चाल करून गेली होती. मनमर्डीच्या सभोवती काही फौजा रणगही तलावाच्या काठी उत्तरेला, तर काही बिकेरीच्या बाजूला दक्षिणेला असे ब्रिटिशांचे 25,000 हून अधिक सैन्यांनी वेढा दिला. कम्पनमर्डी हा कित्तूरचा बालेकिल्ला असा ब्रिटिश सैन्याने वेढला.

ब्रिटिश फौजांचा प्रमुख कॅ. डीकॉन याच्या मदतीला ले. कर्नल वॉकर, ले. कर्नल मंजिले कॅ. मनरो आणि मे. ट्यून्सन हे होते. तर अवरादी वीरप्पा, गोलंदाज हिमतसिंग, नरसिंगराव, गुरुपुत्रप्पा, अमाण्णा देसगाव, संगोळी रायण्णा, बिचगट्टी चन्नबसपा आणि गजवीर है कित्तूरचा सेनापती सरदार गुरुसिया याला साहाय्य करत होते.हे कित्तूरचे नावाजलेले योद्धे होते. 3 डिसेंबरला दिवसभर खलबते चालू होते. इंग्रज सरकारने बंडखोर हा शिक्का मारलेल्या भूमिपुत्राना चिरडून टाकायच्या महत्त्वकांक्षेचे एकमेव निमित्त पुढे करून, केम्मनमर्जीवर 'आखीव' हल्ला करण्याचे त्यांनी योजिले. 3 डिसेंबरच्या रात्रीच्या सुमारास केम्मनमर्डीच्या बुरुजाला निव्वळ सांगाड्याची कळा आलेली होती. जिवंत राहिलेल्या थोड्याफार सैनिकांनी कित्तूरच्या किल्ल्याच्या पूर्वेकडील गडदमडीच्या दिशेने माघार घेतली. 4 तारखेला सकाळी ब्रिटिश सोजिरानी गडदमडीवर घाला घातला. कित्तूरचे बहुतेक शिपाई मारले गेले होते. जे थोडे वाचले त्यांनी अखेरचे आशास्थान असलेल्या किल्ल्यात माघार घेतली. कित्तूर सैनिक भिंतीला पाटी लावून लढत राहिले चार डिसेंबरला मध्यरात्री किल्ल्यामध्ये खिंडारे वडील आणि ब्रिटिश आत घुसले. किल्ल्यातल्या काही शिपायांनी प्रतीकाराचा प्रयत्न केला. पण लगेच त्यांच्यावर मात करण्यात आली. काही पळाले तर काही पकडले गेले. पण त्यांच्यातले पुष्कळ जण आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढत असताना मृत्यू पावले. पाच डिसेंबरला पहाटे ब्रिटिश सैन्याने

किल्ला आपल्या ताब्यात घेतला. कित्तूरला वाचवायचे सर्व प्रयत्न वाया गेले आणि सैन्याचा पराभव झाला तेव्हा काही सरदार किल्ल्यातून निसटून गेले. 5 डिसेंबर 1824 रोजी सकाळी या प्रेतांच्या राशीवर युनियन जॅक रोवण्यात आला. या चिमुकल्या संस्थानाच्या छोट्याशा सैन्याची निव्वळ संख्येच्या बळावर ब्रिटिशांकडून हार आणि कत्तल झाली होती. राणी चन्नमा यांनी प्रज्वलित केलेला स्वातंत्र्य प्रेमाचा अग्नी या पराभवाने भिजवला गेला नव्हता. काही काळ तो केवळ सुप्त राहिला. त्यानंतर त्यांच्या कित्तूर दस्तावर जबरदस्तीने सह्या करून नंतर त्यांना गुप्त पाहऱ्यात बैल होंगलच्या अजंग किल्ल्यात राजबंदी म्हणून ठेवण्यात आले. कित्तुरच्या राजघरातील या तिन्ही स्त्रियांसाठी सुमारे 40 हजार रुपयांचा वार्षिक तनखा देण्यात आला. त्यामध्ये विधवा वीरम्मा, राणी चन्नम्मा व विधवा जानकीबाई या होत्या.

**निष्कर्ष :**

राणी चन्नम्माला तुरुंगवास झाला तरी त्या धैर्य खचल्या नव्हत्या. त्या अंधार कोठडीत, ब्रिटिशांविरुद्ध चाललेल्या दुसऱ्या लढ्याचे आपण नेतृत्व करीत आहोत. कित्तूरची आपली लाडकी प्रजा स्वतंत्र झाली आहे आणि संस्थानाला पुन्हा स्वातंत्र्य मिळाले आहे, असे स्वप्न पाहत राणी चन्नम्मा बैल होंगलच्या किल्ल्यातल्या त्या अंधाराकोटीत बसून राहायची. बैल होंगलच्या किल्ल्यातील सुमारे पाच वर्षाच्या कारावासानंतर 3 फेब्रुवारी 1829 रोजी तिचा मृत्यू झाला

उपरोक्त विवेचनानुसार आपणास असे निदर्शनास येते कि झाशीच्या राणीलक्ष्मीबाई प्रमाणे त्यांच्या अगोदर ब्रिटीशांशी लढण्याचे सामर्थ्य व धाडस कित्तुरच्या रानी चन्नम्मा यांनी केले. रणांगणावर आपल्या प्राणाची पर्वा न करता आपल्या संस्थांनाच्या व रयतेच्या स्वातंत्र्यासाठी प्राण पणाला लावून लढण्याचे काम कित्तुरच्या राणीने केले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला अनेक महिला क्रांतिकारी व स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान देण्यास राणी चन्नम्मा यांचे बलिदान प्रेरक ठरले असे म्हणता येईल.

**संदर्भ:**


1. करकरे कुमुद (१९७८), स्त्रीमुक्ती चळवळ, समाजवादी महिला सभा, पुणे.
2. खडपेकर विनया (१९९१), स्त्री स्वातंत्र्यवादिनी , विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
3. डॉ. बी. आर. बारड (२०१६), भारत के महान क्रांतिकारी, रावत प्रकाशन, दिल्ली.
4. खाडिलकर उषा (१९९९), स्त्रीमुक्ती कुतुहूल, वसंत बुक स्टॉल, मुंबई.
5. राष्ट्रीय चरित्र मला राणी चन्नम्मा - सदासिव वोडेयर